# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 209/2022 दिनांक : 23.05.2022

## 1)खुनः–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 21.05.2022 रोजी 23.30 वा. ते दिनांक 22.05.2022 रोजी 00.30 वा. दरम्यान, **धनेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे **वडील मयत नामे भागवत शिवराम गायकवाड वय 45 वर्षे, रा. तिरुपती नगर धनेगाव ता. जि. नांदेड**, हे लाईट नसल्याने व गर्मी होत असल्याने चार्जीग बल्ब लावून घराचे दरवाज्यात उंबरठयास डोके टेकुन झापेलेले असताना कोणीतरी अज्ञात ईसमाने अज्ञात कारणासाठी घराचे बाहेरील चि-याच्या आकाराचा दगड डोक्यात मारुन गंभीर जखमी करुन खुन केला. वगैरे **फिर्यादी आशिष भागवत गायकवाड, वय 21 वर्षे, व्यवसाय वेल्डींग काम रा. तिरुपती नगर, धनेगाव ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 302/2022 कलम 302 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री विजय पाटील, मो.नं. 9823155291** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**भोकर :–** दिनांक 22.05.2022 रोजी चे 11.00 ते 14.00 वा. चे दरम्यान, **विश्वकर्मा नगर भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बहिणीचे वाढदिवसासाठी धारजणी नांदा भोकर येथे गेले असता फर्यादीचे बंद घराचे दरवाज्याचे कडी तोडुन आत प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटातील नगदी 75,000/– रुपये कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी प्रविण मोहनराव कदम वय 33 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. विश्वकर्मा नगर भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 178/2022 कलम 454,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2090 पांढरे, मो.क्र. 9850733744** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**1)उमरी :–** दिनांक 20.05.2022 रोजी चे 20.30 वा. ते दिनांक 21.05.2022 रोजी चे 06.00 वा. चे दरम्यान, **प्रापर उमरी व्यंकटेश नगर दुधमल सर यांचे घरासमोर, ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होन्डा युनिकॉन कंपनीची मो.सा. क्रं. एमएच–26/बीडब्ल्यु–9163 किमती 1,00,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी सिध्दोधन बाबुराव सोनटक्के, वय 27 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. ढोल उमरी ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 136/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2354 गेडाम, मो. क्र. 9421768528** हे करीत आहेत.

**2)लोहा :–** दिनांक 12.05.2022 रोजी चे 20.00 वा. ते 21.00 वा. चे दरम्यान, **तहसिल कार्यालय लोहा समोरील शुभम ऑनलाईन सेंटर दुकाना समोर लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो.सा. क्रं. एमएच–26/एल–5981 किमती 10,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी विवेकानंद सोपानराव उप्परवाड, वय 35 वर्षे, व्यवसाय ऑनलाईन सेंटर दुकान रा. लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 112/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/408 केंद्रे, मो.क्र. 9730726378** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 21.05.2022 रोजी चे 23.00 वा. चे सुमारास, **आनंद ट्रेनिंग कंपनी,नवामोंढा, नांदेड येथे,** यातील फिर्यादी टीन शेड मधील ठेवलेले हळदीचे पोते वजनी 50 किलो किंमत अंदाजे 2500/– रुपयाची यातील नमुद आरोपीने चोरुन नेत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी कैलास सत्यनारायण बराडीया, वय 30 वर्षे, व्यवसाय व्यापार आडत दुकान रा. आनंद ट्रेनिंग कंपनी, नवामोंढा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 193/2022 कलम 379,511 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री घुगे, मो.क्र. 9822722567** हे करीत आहेत.

## 5)जनावर चोरी :–

**बिलोली :–**दिनांक 20.05.2022 रोजी 20.00 वा. ते दिनांक 21.05.2022 रोजी चे 06.00 वा. दरम्यान, **मौजे बिलोली कोंडलवाडी रोडलगत फिर्यादीचे शेतात ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे जागलीत बांधलेल्या जनावरां पैकी एक गोरा तांबडया रंगाचा किंमती 26,000/–रुपयाचा कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी हणमलु सायन्ना आशामोड, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. लोहारा गल्ली ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 115/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2351 मुद्देमवार मो. क्र. 9049778709** हे करीत आहेत.

## 6)गंभीर दुखापत :—

**रामतिर्थ :—**दिनांक 14.05.2022 रोजी चे 10.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतामध्ये लोहगाव शिवार ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने आमचे धुऱ्याचे गवत कसे काय साफ करतोस ते आत्ताचे आता बंद कर असे म्हणुन रागात येवुन अश्लिल शिवीगाळ करुन कॉलर धरुन खाली पाडले व दगडाने फिर्यादीचे डोक्यात मारुन डोके फोडुन गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी मोहन माधवराव वानोळे वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. लोहगाव ता. नायगाव जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरन 79/2022 कलम 326,294,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री जाधव, मो. नं. 9765902710** हे करीत आहेत.

## 7)विवाहीतेचा छळ :—

**भोकर :—** दिनांक 20.01.2022 चे 18.00 वा. चे सुमारास, **आरोपीच्या घरी आझम कॉलनी हिंगोली ह.मु. बिलाल नगर भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाईस यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करुन प्लॉटची जागा आहे ती माझे नावे कर व मला प्लॉट मध्ये हिस्सा दे व तु मला पसंद नाहीस तु रंगाने काळी आहेस दिसायला चांगली नाही या कारणावरुन तीचा शारिरीक व माणसीक छळ करुन मारहाण केली. शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 32 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 176/2022 कलम 498(अ),323, 504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/69 जाधव , मो.क्रं. 9373304540** हे करीत आहेत.

## 8)भारतीय हत्यार कायदा :—

**लिंबगाव :—** दिनांक 21.05.2022 रोजी चे 23.55 वा. चे सुमारास, **खडकपुरा ते हस्सापुर रोडवरील अहिल्याबाई होळकर ब्रिज कडे जाणारे टी पॉईंट वर हसापुर शिवार, ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या दोन तलवारी किंमती 1000/— रुपयाचे ताब्यात बाळगलेले मिळुन आले व दोन इसम तलवारीसह मोटार सायकल वर पळुन गेले. वगैरे **फिर्यादी पोना/2811 भारत नवसाजी केंद्रे, ने. पोस्टे लिंबगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 90/2022 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री जहागीरदार, मो.क्र. 9822337382** हे करीत आहेत.

## 9)पाण्यात बडुन मृत्यु :—

**1)कंधार :—**दिनांक 22.05.2022 रोजी चे 02.00 वा. ते 02.30 वा. दरम्यान, मन्याड नदीचे पात्रात स्वप्निल लुंगारे यांचे शेताचे जवळ कंधार शिवारात **ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे 1) सौरभ सतीश लोखंडे, वय 16 वर्षे, रा. लॉकॉलेज जवळ कंधार ता. कंधार जि. नांदेड, 2) ओम राजु काजळेकर वय 15 वर्षे रा. गवंडीपार कंधार** हे मुले पाण्याचा अंदाज न आल्याने व कमी पोहता येत असल्याने तसेच पात्रात गाळ असल्याने पाण्यात पडुन मरण पावले. वगैरे **खबर देणार सतीश संभाजीराव लोखंडे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. लॉकॉलेज जवळ कंधार ता. कंधार जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कंधार** आ. मृ. **16**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री गणाचार्य, मो.नं. 9823311570** हे करीत आहेत.

**2)मुखेड :—**दिनांक 25.05.2022 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **डोंगरगाव येथील नदीचे पाण्याचे पात्रात ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे संतोष रामराव तेलंग वय** 25 **वर्षे रा. तग्याळ ता. मुखेड जि.** हा मावशीचे घरी डोंगरगाव येथे जावून डोंगरगाव येथील मन्याड नदीत आंघोळ करण्यासाठी गेला असता तो पाण्यात पडुन मरण पावला. वगैरे **खबर देणार रामराव संतुक तेलंग, वय 60 वर्षे, व्यवसाय शेती रा. तग्याळ ता. मुखेड जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मुखेड** आ. मृ. **25**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बी.आर. जाधव, मो.नं. 9850072078** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड